| Publication | Edition | Date | Page No. | Subject |
|---|---|---|---|---|
| Saamna | Mumbai | 21/05/2019 | 09 | Sunny Pawar wins 'The Best Child Actor' Award |

■ साऊथ एशियन चित्रपट महोत्सव

# मुंबईचा सनी पवार ठरला सर्वोत्कृष्ट बालकलाकार

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) – न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिवलपाठोपाठ नुकत्याच पार पडलेल्या साऊथ एशियन चित्रपट महोत्सवातही 'चिप्पा' या चित्रपटासाठी ११ वर्षीय सनी पवार याने सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा पुरस्कार पटकावला आहे.

साऊथ एशियन चित्रपट महोत्सव १६ ते १९ मेदरम्यान अमेरिकेतील डल्लास येथे पार पडला. महोत्सवाचे यंदाचे पाचवे वर्ष होते. अंतिम फेरीतील तीन स्पर्धकांमधून परीक्षकांनी सनीची या पुरस्काराची निवड केली. गेल्याच आठवड्यात पार पडलेल्या १९ व्या न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिवलमध्येही सनी सर्वोत्कृष्ट बालकलाकार ठरला होता.

कोलकाता येथे राहणाऱ्या दहा वर्षीय मुलाची हृदयस्पर्शी गोष्ट 'चिप्पा'मध्ये आहे. यात सनी शीर्षक भूमिकेत आहे. अनेक वर्षे आपल्या वडिलांपासून लांब राहिल्यावर अखेर दहाव्या वर्षी या मुलाला आपल्या बाबांचे एक पत्र मिळते आणि इथे या मुलाचा रंजक प्रवास सुरू होतो. एका रात्रीत घडत असलेल्या या कथेत मग विविध रंजक वळणे येतात आणि या 'चिप्पा'ची गोष्ट पुढे सरकते.



चिप्पा हा सिनेमा माझ्यासाठी स्पेशल आहे. दिग्दर्शक सफदार रेहमान आणि चिप्पाच्या टीमने माझ्यावर विश्वास दाखवत ही भूमिका साकारण्याची संधी मला दिली. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. परीक्षकांचेही आभार. माझ्या अभिनयाच्या प्रवासात आईवडिलांनी मला मोलाची साथ दिली. त्यामुळे मी ईथवरचा पल्ला गाठू शकलो.

■ सनी पवार, बालकलाकार